# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातल भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.१४-१०-२०२४ ते दि.१०-११-२०२४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या संगणक आधारीत **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा राज्यातील ४५ परीक्षा केंद्रावर दि.१०-२-२०२५ ते दि.१३-२-२०२५ व दि.१७-२-२०२५ रोजी** विविध सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

१. उक्त नमुद सदर संगणक आधारीत वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या उत्तरतालिका व प्रश्नतालिका पाहण्याची तसेच प्रश्नतालिका /उत्तरतालिका याबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याबाबतची ऑनलाईन सुविधा शुक्रवार **दि.२८-२-२०२५ते दि.८-३-२०२५** पर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

२. त्यानुसार, उमेदवारांनी सादर केलेले आक्षेप विचारात घेवून,उक्त नमुद ऑनलाईन परिक्षेची **सुधारीत उत्तरतालिका दि. २४/४/२०२५ पासून** पाहण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर सुविधेसाठी उमेदवारांनी https://www. wcdcommpune.com या संकेतस्थळावर त्यांचे विहीत आयडी व पासवर्डव्दारे लॉग इन करावे.

३. सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमदेवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत गैरमार्गाने नोकरी देण्याचे/परीक्षा पास करुन देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास अशा भूलथापांना बळी न पडता त्याबाबत नजिकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क साधून तक्रार करण्यात यावी.

४. भरती प्रक्रियेशी संबधीत अदयावत सूचना/प्रसिध्दीपत्रक याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या https://www.wcdcommpune.com संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याबाबत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी व ईमेलवर वेळोवेळी पाठविण्यात येणा-या सूचनांचे उमेदवारांनी पालन करावे. सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने, **आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील याची सर्व उमदेवारांनी नोंद घ्यावी.**

५. https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर लॉगिन करताना तांत्रिक अडचणी आल्यास संबधित उमेदवारांनी **७३५३००९०९४** या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.

दिनांक :- २३/०४/२०२५
स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**